क्रमांक : ९७

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग-दोन**

**गुरुवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ / श्रावण २०, १९४४ (शके)**

**९७. लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-**

१) महाराष्ट्र विधानसभेचे **सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन, बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२** रोजी पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. गुरुवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना घेण्यात येणार आहेत. सदर निर्णयानुसार लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्यांकडून **शुक्रवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ ते मंगळवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ पर्यंत अपवादात्मक बाब म्हणून २४ तास तसेच दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजीपासून सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

२) महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे. तसेच लक्षवेधी सूचनेचे प्रारूप जास्तीत जास्त १५० ते १७५ शब्दांचे असावे.

३) लक्षवेधी सूचना संपूर्णतः **ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येत असल्याने मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार ऑनलाईन (online) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या लक्षवेधी** सुचनांवरील **सन्माननीय सदस्यांची नावे ग्राह्य धरण्यात येतील. ऑफलाईन (Offline) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या लक्षवेधी सुचनांवरील सन्माननीय सदस्यांची नावे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

४) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण **३ दिवस** अगोदरचा दिवस हा **ऑनलाईन** (online) **पध्दतीने लक्षवेधी सूचना** स्वीकारण्यासाठीचा अंतिम दिवस असेल.

५) लक्षवेधी सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेणेसंबंधीचा संपूर्णतः अधिकार हा **मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचाच राहील** याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२२.

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :-

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
६. मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
७. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील पक्ष कार्यालये.
८. कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
९. संगणक कक्ष (WEBSITE).
१०. एम.के.सी.एल कक्ष (MKCL).